Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ७० • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.३ डिसेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

शालेय पोषण आहारातील तांदळाचा काळा बाजार, पोलीस अधीक्षकांनी केला पर्दाफाश

वर्धा पोलिसांची मोठी कारवाई ; तिघांना अटक

पुलगाव – मागील अनेक महिन्यांपासून शाळांमध्ये वाटप करण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहाराचा काळाबाजार सुरु असल्याचे राज्यातील विविध जिल्ह्यात दिसून आले आहे. पोलिस अधीक्षक नुरुल हसन यांनी पुन्हा एकदा मोठी कारवाई करीत वर्धा जिल्ह्यात सुरु असलेल्या पोषण आहारातील काळ्याबाजाराचा पर्दाफाश केला आहे. याप्रकरणात तीन आरोपींना अटक केली असून कंत्राटदार फरार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पोलिसांनी एकूण मालवाहू वाहनासह ८ लाख ६९ हजार ८१० रुपयांचा पोषण आहारातील धान्यसाठा जप्त केला आहे.

या प्रकरणी किशोर नारायण तापडीया (४६ रा. रामनगर), विनोद बबन भांगे (४० रा. बोरगाव मेघे), शेख रहीम शेख करीम (४६ रा. स्वस्तिक नगर सावंगी) असे अटक केलेल्या आरोपींचे नाव असून मुख्य कंत्राटदार अंकित सतीश अग्रवाल रा. मुर्तीजापूर हा फरार असल्याचे सेवाग्राम पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर चकाटे यांनी सांगितले.पोलिसांच्या माहितीनुसार मालवाहू चालक विनोद भांगे याला वाहनासह ताब्यात घेतले असता २५ क्विंटल तांदुळ अवैधरित्या वाहतुक करताना मिळुन आला. त्याने हा तांदुळ किशोर तापडीया याच्या औद्योगिक वसाहतीत असलेल्या गोदामातून विकत घेतल्याचे सांगितले. आणि आरोपी शेख रहीम शेख करीम याला विकणार असल्याचे सांगितले. आरोपी किशोर तापडीया हा वर्धा तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीपर्यंतच्या शाळांना शाळांना शासनाकडुन पुरविण्यात येणाऱ्या तांदळाचा काळाबाजार करुन तो

तांदुळ विकतो. असे निष्पन्न झाल्याने गोदामाची तपासणी केली असता एफसीआयचे सिल लागलेले व पोत्यांवर 'राज्य सरकारी विपणन संघ मर्यादीत' असे पिंट केलेले ५० किलो वजनाचे तांदुळानी भरलेले पोते दिसुन आले. तसेच गोदामात रिकामे पोते, मटकी, खाद्य तेल, मिरची पावडर व आदी पाकिटं तसेच एफसीआय गोदामात धान्य उचल केल्याचे बिल पावत्या, मालाच्या देवाण-घेवाणचे रजिस्टर मिळुन आले. किशोर तापडीया याला विचारणा केली असता फरार आरोपी अंकित अग्रवाल याला वर्धा जिल्हयातील जिल्हा परिषद व खासगी अनुदानीत शाळांना धान्य पुरविण्याचे कत्रांट देण्यात आले असुन अंकित अग्रवाल याने धान्य पुरविण्याचे सब कॉन्ट्रॅक्ट हे किशोर नारायण तपाडीया याला दिलेला आहे. किशोर तपाडीया याने जिल्हा परिषदेच्या शाळांना पुरवठा करण्याकरीता एफ सी आय गोदामातून घेतलेला तांदुळ खासगी गोदामात साठवणूक केल्याचे समजल्याने त्यास अटक करुन तब्बल ८ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.जिल्ह्यात आणखी काही ठिकाणी असाच प्रकार सुरु असून हिंगणघाट आणि कारंजा येथे कारवाई सुरु असल्याची माहिती

माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या पाठपुराव्याला मिळाले यश..!

वनविभागाच्या अतिक्रमित जमिनीची मोजणी करिता शासनाने दिली मंजुरी

मूलचेरा । प्रतिनिधी

तालुक्यातील ६९ गाव पैकी २२ गावे ही बंगाली बहुल आहेत.या भागातील ५ गावातील बंगाली बांधव मागील अनेक वर्षापासून वनविभागाच्या जमिनीवर अतिक्रमण करून शेती करीत आपला उदरनिर्वाह करीत आहेत.या अतिक्रमित वनजमिनीचे मोजमाप करून सातबारा मिळावा यासाठी वनविभागाकडे त्यांनी मागणी लावून धरली होती.विशेष म्हणजे माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी यासाठी सातत्याने महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या कडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश आले.मूलचेरा तालुक्यातील मार्खंडा वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत येत असलेल्या विश्वनाथनगर, लक्ष्मीपूर, विजयनगर, गांधीनगर,कालीनगर, या ५ गावातील २९ अतिक्रमित बंगाली बांधव धारकांना जमिनीची मोजणी करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे.मूलचेरा तालुक्यातील २२ गावात बहुसंख्य बंगाली समाजबांधव वास्तव्याने असून मागील अनेक वर्षापासून विश्वनाथनगर,

लक्ष्मीपूर, विजयनगर, गांधीनगर,कालीनगर या ५ गावातील बंगाली बांधव वनजमिनीवर अतिक्रमण करून शेती करत आले आहेत.मात्र शासनाकडून त्यांना हक्काच्या सातबारा मिळाला नाही. संबंधित शेतकऱ्याद्वारे अतिक्रमित जमिनीचे मोजमाप करून हक्काच्या सातबारा मिळावा यासाठी प्रशासन स्तरावर निवेदन, अर्ज सादर केले. मात्र याकडे सातत्याने दुर्लक्ष झाले. पण ही बाब अतिक्रमित शेतकऱ्यांनी माजी राज्यमंत्री तथा माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांचे समोर मांडली.त्यावेळी त्यांनी अतिक्रमण धारकांना हक्काची जमीन मिळावी,यासाठी सातत्याने महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या कडे पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना आज यश आले आहे.

शासनाने बंगाली बांधवांची मागणी मान्य करीत तालुक्यातील ५ गावातील २९ अतिक्रमण धारक शेतकऱ्यांची शेतजमिनीची मोजणी भूमि अभिलेख कार्यालयात मार्फत करण्याच्या सूचना दिल्या आहेत.यासाठी लागणारा खर्च शासनाने मंजूर केला आहे. त्यामुळे तालुक्यातील अतिक्रमकधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

आमदार सुभाष धोटे यांनी केली

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतीची पाहणी

गडचिरोली । प्रतिनिधी

मागील अनेक दिवसापासून जिल्ह्यात जंगली हत्ती आणि नरभक्षक वाघाची धुमाकूळ चालू आहे.अश्यात अवकाळी पावसाने लावेल्या हजेरीने जिल्ह्यातील शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, काँग्रेसचे जेष्ठ नेते तथा आमदार सुभाष धोटे यांनी गडचिरोली जिल्हातील नुकसानग्रस्त भागाची पाहनी केली. व शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले, व आगामी काळात होणाऱ्या हिवाळी अधिवेशनादरम्यान संपूर्ण काँग्रेस पक्षाच्या वतीने काँग्रेस पार्टीचे सर्व आमदार गडचिरोली जिल्ह्याच्या व जिल्ह्यातील शेतकऱ्याच्या समस्या सभागृहात लावून धरणार व शेतकरी राजांच्या झालेल्या नुकसानीचा योग्य तो मोबदला मिळवून देण्याकरिता आपण पूर्ण प्रयत्न करणार असल्याचे आमदार सुभाष धोटे यांनी सांगितले.त्यांनी चामोर्शी तालुक्यातील अनखोडा, येणापूर, अड्याळ, सह अनेक

गावांना भेटी दिल्या व शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.या दौऱ्यादरम्यान गडचिरोली जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे, युवक काँग्रेस प्रदेश सचिव विश्वजीत कोवासे, चामोर्शी तालुकाध्यक्ष प्रमोद भगत, जिल्हाउपाध्यक्ष नीलकंठ निखाडे, गडचिरोली तालुकाध्यक्ष वसंत राऊत, आरमोरी तालुकाध्यक्ष मिलिंद खोब्रागडे, अनुसूचित जाती सेल अध्यक्ष रजनीकांत मोटघरे, सोशल मीडिया अध्यक्ष संजय चन्ने, जावेद खान, प्रफुल बारसागडे, मुन्ना गोंगले, यादव मेश्राम, हेमंत कुमरे, विश्वास बोमकंटीवार, कोमल आकेवार, बाळू निखाडे, नेहाल आभारे, तेजस कोंडेकर,विवेक दांडे , शेतकरी विनोद येलमुळे व जयराम राऊत सह यावेळी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांचा 'महाजनसंपर्क' ठरला नागरीकांसाठी मोलाचा

संपूर्ण जिल्ह्यात उपक्रम राबविण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना

चंद्रपूर । प्रतिनिधी

नागरीकांच्या समस्यांचे तात्काळ निराकरण व्हावे व त्यांना वेगवेगळ्या कार्यालयांच्या सातत्याने फेऱ्या मारण्याचे काम पडू नये यासाठी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेले 'महाजनसंपर्क' चंद्रपूरकरांसाठी मोलाचा ठरला.चंद्रपूर येथील नियोजन भवनात शुक्रवारी, १ डिसेंबर रोजी ना. मुनगंटीवार यांनी नागरीकांशी संवाद साधत त्यांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी नागरीक वेगवेगळ्या सरकारी विभागातील कार्यालयांच्या फेऱ्या मारत असतात. परंतु अनेकदा त्यांचे प्रश्न सुटत नाहीत. त्यामुळे त्यांची गैरसोय होते. ही बाब लक्षात घेता ना. श्री. मुनगंटीवार यांनी स्वत: पुढाकार घेत 'महाजनसंपर्क' घेतला. या महाजनसंपर्क कार्यक्रमाला भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष राहुल पावडे, माजी भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा संध्याताई गुरनुले, माजी समाज कल्याण सभापती ब्रीजभूषण पाझारे,जिल्हाधिकारी विनय गौडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम., महापालिका आयुक्त विपीन

पालीवाल मोठ्या संख्येने जिल्हाभरातील नागरीक यावेळी उपस्थित होते. यावेळी ना. मुनगंटीवार म्हणाले की, सर्वांनीच जनतेच्या समस्यांचे निराकरण करण्याला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. 'महाजनसंपर्क' हा त्यासाठी महत्वाचा दुवा ठरू शकतो. केवळ एकदा 'महाजनसंपर्क' घेऊन थांबणे योग्य होणार नाही. संपूर्ण जिल्ह्यात अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाणे गरजेचे आहे.जिल्ह्यातील सर्व सहा विधानसभा मतदार संघात आगामी काळात 'महाजनसंपर्क' घेण्यात यावे, अश्या सूचना पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या.आपण सुरुवातीपासूनच जनतेच्या समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले आहे. पालकमंत्री या नात्याने तर जिल्ह्याचे पालकत्वाची जबाबदारी आपल्याकडे आहे. अशात लोकांना अडीअडचणींचा सामना करीत प्रशासनापर्यंत पोहोचण्याची कसरत करायला लावण्यापेक्षा प्रशसानाला त्यांच्यापर्यंत कसे पोहोचविता येईल, हाच प्रयत्न आपला राहणार आहे. त्यामुळे सर्व विभागातील अधिकाऱ्यांनीही याच दृष्टीने नियोजन करीत पावले टाकावी, असे निर्देश ना. सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेत.

स्वयंरोजगाराच्या माध्यमातुनच प्रगती साधता येईल-डॉ.आगलावे

वरोरा । प्रतिनिधी

स्वयंरोजगाराच्या व व्यवसायाच्या माध्यमातुनच प्रगती साधता येणार असल्याचे मत श्री. गुरूदेव प्रचारक डॉ. अंकुश आगलावे यांनी रोटरी उत्सव वरोरा येथे व्यक्त केले.या उत्सवात रोटरीं क्लब वरोराच्या हस्ते डॉ. आगलावे यांचा सत्कार करण्यात आला. मागील आठ वर्षापासून मोठया धुमधडाक्यात रोटरी उत्सव साजरा करण्यात येते. दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी रोटरी उत्सवानी वरोडावासीयांचे मने जिंकले असल्याचे डॉ. आगलावे यांनी भाषणातुन सांगितले.डॉ. आगलावे पुढे म्हणाले की, भारताची लोकसंख्या झपाटयाने वाढत असून रोजगाराचा प्रश्न युवावर्गात उभा ठाकला आहे. सुशिक्षित बेरोजगाराची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. मागील काही वर्षात अनेक शिक्षित युवा वर्ग बेरोजगार आहे. रोटरी उत्सवाच्या माध्यमातुन युवा वर्गाला स्वयंरोजगाराची चालना मिळून भविष्यात युवावर्ग स्वतःचा व्यवसाय उभा करू शकतो असे डॉ. आगलावे यांनी सांगितले. आई वडिल मुलांना संस्कारीत करते परंतु शिक्षकांची भुमिका तेवढीच महत्वाची असल्याचे यावेळी सांगितले. रोटरी उत्सवात मोठया संख्येने रोटरी क्लबचे सदस्य, नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.

संपादकीय

गुंतवणूक दारांच्या देशा!

भारतीय अर्थव्यवस्थेविषयी सतत विविध प्रकारची मते व्यक्त होत असतात, त्यात राजकीय अभिनिवेश अधिक असतो. देशाची स्थिती बरी आहे, की वाईट आहे, हे त्या त्या व्यक्तीचा राजकीय कल काय आहे यावरून ठरत असते. दोन्ही बाजू आपल्या समर्थनार्थ सोयीचे तेवढे मुद्दे मांडत असतात. शेअर बाजाराकडे वाढलेला ओढा आणि मध्यमवर्गीयांची याबाबतची ओसरत चाललेली भीती याचा विचार केला तर, मात्र अतिशय सकारात्मक असे चित्र उभे राहते. देशातील करदात्यांची संख्या अवधी आठ कोटी असताना एखादा नवा आयपीओ बाजारात येतो तेव्हा उडणारी झुंबड हे त्याचेच लक्षण म्हणता येईल.टाटा टेक्नॉलाजीज, गांधार रिफायनरी, फ्लेअर राइटिंग इंडस्ट्रिज, इरेडा आणि फेडबँक फायनान्शिअल असे पाच आयपीओ या आठवड्यात एकाच वेळी बाजारात आले. या पाच आयपीओंसाठी मिळून एकूण अदमासे अडीच लाख कोटींची बोली भारतीयांनी लावली आहे. सरासरी काढली तर ही बोली आयपीओच्या क्षमतेच्या पन्नास पटीने अधिक आहे. अर्थातच टाटा टेक्नॉलॉजीजला सर्वाधिक पसंती मिळालेली आहे. टाटांचा लौकिक आणि टाटांच्या सर्वच कंपन्यांची कामगिरी यामुळेच हा विश्वास दाखवला गेला आहे. अलिकडे एलआयसीसारख्या काही आयपीओंना असाच मोठा प्रतिसाद मिळवला आणि नंतर गुंतवणूकदारांची निराशा केली होती; परंतु अशा छोट्या मोठ्या धक्क्यांनी फार फरक पडू नये इतपत गुंवणूकदार आता बाजाराला सरावलेले आहेत. सत्तरीच्या आसपास जाऊन मागे फिरलेला सेन्सेक्स ६४ हजारांपर्यंत खाली जाऊन आता पुन्हा ६६ हजारांच्या आसपास आलेला आहे. असे चढ-उतार पचवूनही गुंतवणूक करण्यास मागे पुढे न पाहणारा मोठा वर्ग आता तयार झालेला आहे. आपल्या मिळकतीतल्या काही रक्कमेबाबत अशा प्रकारे जोखीम पत्करण्याची तयारीही अनेकांची असते.म्युच्युअल फंडात एसआयपी करणारे वाढले आहेत, शेअर बाजारातील चढ-उतारांवर लक्ष ठेवून व्यवहार करणारे वाढले आहेत आणि गुंतवणूक सल्ला देणारेही वाढले आहेत. एफडी सारखे बचतीचे सुरक्षित मार्ग स्वीकारतानाच धाडस करून गुंतवणूकीचे इतर प्रयोगही केले जात आहेत. मध्यमवर्गीयांची वाढलेली संख्या आणि उत्पन्न हे यासाठी जसे कारणीभूत आहेत, त्याचप्रमाणे बदलत असलेली वृत्तीही आहे. बचत, गुंतवणूक आणि खर्च यांचा ताळमेळ बसवून पर्यटनापासून तर हॉटेलिंगपर्यंत खिसा मोकळा करण्याची मानसिकता तरुण पिढीतही वाढल्याचे दिसून येत आहे. देशाची अर्थव्यवस्था कशी असेल ती असो, मध्यमवर्गीयांची अर्थव्यवस्था मात्र सुधारली आहे हे नक्कीच. आर्थिक उदारीकरणाची प्रक्रिया कोणीही सुरू केलेली असो, ते धोरण पुढे नेताना राजकारण आडवे आले नाही, याची आपण दखल घेतलीच पाहिजे.

अजय कंकडालवार यांच्या कडून लेंनगुरे परिवाराला आर्थिक मदत

अहेरी । प्रतिनिधी

तालुक्यातील छल्लेवाडा येथील सुरेश तिरुपती लेंनगुरे यांच्या घराला अचानक आग लागल्याने संपूर्ण घर आगीत जळून खाक झाले.त्यात जीवनावश्यक वस्तु व पैसे,आधार कार्ड,पास बुकसह इत्यादी आवश्यक कागदपत्रे जळून खूप मोठे नुकसान झाले ही माहिती आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे विदर्भ नेते व माजी जि. प.अध्यक्ष अजय कंकडालवार यांना माहिती होताच कुटूंबातील प्रमुख व्यक्ती नामे सुरेश लेंनगुरे यांना अहेरी येथील जनसंपर्क कार्यालयात बोलावून आर्थिक मदत देण्यात आली .प्रशासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक लाभासाठी मदत करणार असल्याचं सांगत कुटुंबाला धिर देत प्रत्येक लोकप्रतिनिधींनी जनतेच्या अडीअडचणी किंवा असे अचानक झालेल्या अपघाता वेळी सहकार्य करणे गरजेचे असल्याचं ते बोलले.यावेळी माजी जि.प.सदस्य अजय नैताम,माजी जि.प.सदस्य कु.सुनीता कुसनाके,भास्कर तलांडे माजी प.स.सभापती अहेरी, प्रशांत गोडसेलवार नगरसेवक नगरपंचायत अहेरी सुधाकर तिम्मा आ.वि.स.तालुका अध्यक्ष ,अशोक येलमुले उपसरपंच,भामरागड ,हनमंतु लसमय्या ठाकरे,संजीव चेकनलवार,श्रीनिवास लेंडगुरे,विलास बोरकर,गुलाब देवगडे, दासू कांबडे, सुनील रत्नम,राजाराम दुर्गे,प्रशांत गुरनुले,महेश गुरनुलेसह आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे पदाधिकारी कार्यकर्ते - गावातील नागरिक उपस्थित होते.

शंकरपूर येथे राज्य महामार्गाच्या कामा साठी सोमवारला रास्ता रोको आंदोलन

शंकरपूर तसेच परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे शहर युवक काँग्रेस कमिटीचे आवाहन

चिमूर – चिमूर ते कान्पा रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून ते खड्डे बुजविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने लाखोचा खर्च केला परंतु त्याचा काहीही उपयोग झाला नाही सर्व खर्च हा पाण्यात गेला. सध्या या रोडवर मोठमोठे खड्डे पडले असून येणाऱ्या जाणाऱ्या जड वाहन तसेच इतर वाहनामुळे या राज्य महामार्गावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे.त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या धुळीचा त्रास शंकरपूर येथील रोड लगतच्या दुकानदारांना तसेच रोड लगत घर असणाऱ्यांना होत आहे. या धुळीमुळे समोरून येणारे वाहन सुद्धा बरोबर दिसत नाही त्यामुळे बरेच अपघात होत आहेत व धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून गावात सर्दी खोकल्याचे रुग्ण वाढत आहेत त्यामुळे या रोडचे बांधकाम तात्काळ सुरू करावे यासाठी शंकरपूर येथील युवकांनी या मार्गावर बेशरम ची झाडे लावून आंदोलन केले तरीही बांधकाम

विभागाला जाग आली नाही.

या रस्त्याचे काम पंधरा दिवसात सुरू करावे अशा प्रकारचे निवेदन शहर युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने उपविभागीय अभियंता चिमूर यांना दिनांक १५ नोव्हेंबरला देण्यात आले होते. अन्यथा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला होता.तरीही बांधकाम विभागाने रोडचे काम सुरू केलेले नाही. त्यामुळे झोपेत असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाला जागे करण्यासाठी व रोडवरील धुळीच्या साम्राज्यापासून मुक्ती मिळवण्यासाठी दिनांक ४ डिसेंबर रोज सोमवारला शंकरपूर येथे बस स्टॉप वर शहर युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने तसेच ग्रामपंचायत शंकरपूर व शंकरपूर तसेच परिसरातील नागरिक यांनी रास्ता रोको आंदोलन करण्याचे जाहीर केले आहे.या रास्ता रोको आंदोलनाला जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश डॉ. सतीश वारजूकर यांचे उपस्थितीत राहणार असून या रोडवरील खड्ड्यांपासून व धुडी पासून मुक्ती मिळवण्यासाठी या आंदोलनाला शंकरपूर तसेच परिसरातील जनतेने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून रास्ता रोको आंदोलन यशस्वी करावे असे आव्हान शहर युवक काँग्रेस कमिटी तसेच ग्रामपंचायत शंकरपूर तर्फे करण्यात आले आहे.

माणूस आणि शीतसुप्तावस्था

मानवसदृश नर-वानर गटातील काही प्राणी हिवाळ्याचा काळ अंधाऱ्या, सुरक्षित गुहेत घालवत असत. यामुळे लांब आणि अतिथंड हिवाळ्यात माणूस एखाद्या अस्वलाप्रमाणे शीतसुप्तावस्थेत जाऊ शकेल का, असा प्रश्न पडतो. वाचा डॉ. नीलिमा कुलकर्णी यांचा लेखप्राण्यांतील शीतसुप्तावस्था ही हवामान आणि अन्नाची उपलब्धता यामुळे निर्माण होत असावी. पक्षी आणि सस्तन प्राण्यांनी बाह्यतापी ते उष्माग्राही या संक्रमण काळात ऊर्जा राखण्यासाठी (तापमाननियंत्रण क्षमता नसताना) शीतसुप्तावस्थेचा सुरुवातीचा काळ अनुभवला असेल. शीतसुप्तावस्थेमध्ये चयापचयाची क्रिया दडपली जाऊन बऱ्याचशा शरीरक्रियात्मक घडामोडी मंदावतात. काही प्राणी त्यासाठी क्रियाशीलता कमी करतात. सरीसृप प्राण्यांतील हिवाळ्यातील वर्तणुकीतील निष्क्रियता ही 'बृमेषन' प्राण्यांना अतिथंड हवामानाचा सामना करण्यासाठी उत्क्रांत झाली. शरीराचे तापमान स्थिर ठेवणारे पक्षी आणि सस्तन प्राण्यांसारख्या उष्माग्राही प्राण्यांमध्ये शीतसुप्तावस्था अनेक वेळा उत्क्रांत झाली असावी.बऱ्याचशा विशालकाय उष्माग्राही पक्षी आणि सस्तन प्राण्यांनी त्यांच्या सामायिक पूर्वजांपासून वेगळे झाल्यावर सुप्तावस्था आणि शीतसुप्तावस्था या क्षमता गमावल्याचे दिसते. मानवसदृश नर-वानर गटातील काही प्राणी हिवाळ्याचा काळ अंधाऱ्या, सुरक्षित गुहेत घालवत असत. यामुळे लांब आणि अतिथंड हिवाळ्यात माणूस एखाद्या अस्वलाप्रमाणे शीतसुप्तावस्थेत जाऊ शकेल का, असा प्रश्न पडतो. एका अभ्यासानुसार, मानवाच्या लुप्त पावलेल्या पूर्वजाने शीतसुप्तावस्थेत जाण्यासाठी प्रयत्न केला असावा. त्याच्या खुणा, प्राण्यांच्या सांगाड्यात तसेच काही अन्नघटकांच्या कमतरतेमुळे येणाऱ्या व्याधींमधून दिसल्या. पूर्वजांमधील जनुक आणि जीवाष्मांच्या मदतीने असे दिसून येते की, फार पूर्वी मानवाला शीतनिष्क्रियतेकडे जाण्याची क्षमता होती. मानवासाठी अशा प्रकारची क्षमता अनेक प्रकारे फायद्याची ठरू शकेल. अत्यवस्थ असलेल्या व्यक्तीला उपचारांची उपलब्धता होईपर्यंत शीतसुप्तावस्थेत ठेवता येईल का, तसेच अंतराळ प्रवासात अशा प्रकारची शीतसुप्तावस्था उपयोगी ठरू शकेल का, यावर शास्त्रज्ञ काम करीत आहेत.'यूसीएल'मधील स्टीव्हन होरवथ यांच्या अभ्यासानुसार, प्राण्यांमधील वृद्ध होण्याची प्रक्रिया शीतसुप्तावस्थेत मंदावल्याचे दिसले. मानवाच्या शीतसुप्तावस्थेचा मेंदूवरील परिणाम लक्षात घेताना, झोपेवर नियंत्रण ठेवणारे मेंदूतील व्यापार आणि त्याच्या अण्विक जोडण्या उलगडून त्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास आवश्यक ठरतो. मनुष्यप्राण्यामध्ये सुरक्षित शीतसुप्तावस्था उत्पन्न करण्याची क्षमता आणि शक्यता तपासताना औषधशास्त्र, आनुवांशिक साधने आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा अभ्यास होणे गरजेचे ठरते.

वैश्विक संधीचे कवित्व



एकूण जागतिक उत्पन्नातील ८५ टक्के वाटा आणि व्यापारातील ७५ टक्के वाटा उचलणाऱ्या देशांचा समूह असलेल्या 'जी ट्वेंटी'चे अध्यक्षपद भारताकडून ब्राझीलकडे जात आहे. राजधानी नवी दिल्लीत सप्टेंबरमध्ये भरलेल्या शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लुईझ इनासियो लुला यांच्याकडे अध्यक्षपद औपचारिकपणे सुपूर्द केले आहेच; परंतु भारताची अध्यक्षीय कारकीर्द अधिकृतरीत्या गुरुवारी ३० नोव्हेंबरला संपली. 'जी-ट्वेंटी'चे यजमानपद संपले असले, तरी त्याचे कवित्व अद्याप कायम आहे.'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' हे उद्दिष्ट समोर ठेऊन भारताने जी-ट्वेंटीचे यजमानपद स्वीकारले आणि ते यशस्वी करून दाखविले. या जागतिक संघटनेच्या प्रमुखपदी राहून भारताने विकसनशील देशांचा आवाज बळकट केल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी अभिमानाने नमूद केले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात नवनवीन संज्ञा चलनात येत असतात. प्रामुख्याने आशिया आणि आफ्रिका खंडांतील गरीब व विकसनशील देशांसाठी प्रगत देश 'थर्ड वर्ल्ड' असा अवमानकारक उल्लेख करीत असत. ही संज्ञा केव्हाच मागे पडली असून, आता गेल्या काही वर्षांपासून आशिया, आफ्रिका; तसेच दक्षिण अमेरिका यांमधील विकसनशील देशांसाठी 'ग्लोबल साउथ' ही संज्ञा वापरली जात आहे. या 'ग्लोबल साउथ'मधील देशांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यांच्या चिंता आणि त्यांच्या आकांक्षा यांना भारताने जी-ट्वेंटीच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणल्या. ५५ देशांचा समूह असलेल्या आफ्रिकी समुदायाला 'जी-ट्वेंटी'चे कायम सदस्यत्वही नवी दिल्लीतील शिखर परिषदेतच मिळाले. त्यामुळे या संघटनेची व्याप्ती वाढली. रशिया-युक्रेन युद्धामुळे जग विभागलेले असताना दोन्ही टोकांवरील देशांमध्ये समन्वय साधून, शांततेची गरज अधोरेखित करणारा ठराव या परिषदेत एकमताने मंजूर करून घेण्याची अवघड कामगिरी भारताने साध्य केली.'जी ट्वेंटी'च्या व्यासपीठावरून आर्थिक विषयाच्या जोडीनेच पर्यावरण, हवामान बदल, ऊर्जा, शाश्वत विकास, शिक्षण, पर्यटन अशा विविध विषयांवरील मंथन भारताने वर्षभरात घडवून आणले. साठ शहरांत 'जी ट्वेंटी'च्या बैठकांचे आयोजन करून या परिषदेची देशभर वातावरण निर्मिती केली गेली. वर्षभरात २२० बैठका झाल्या आणि त्यासाठी सव्वाशे देशांमधून आलेले एक लाख प्रतिनिधी आले. या महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे रूपांतर एका इव्हेंटमध्ये केले गेले, असा आरोप होऊ शकतो; परंतु त्यामुळे ही परिषद सर्वांपर्यंत नेल्याचे महत्त्व कमी होत नाही. भारताकडे यजमानपद आले त्यावेळी जग कोव्हिड साथरोगामुळे बसलेल्या आर्थिक फटक्यातून सावरत होते. त्या पार्श्वभूमीवर आर्थिक वृद्धीच्या भोवती केंद्रीत असलेल्या प्रगतीच्या संकल्पनेबरोबरच काही पर्यायी विषयही ऐरणीवर आणणे आवश्यक होते. ते भारताने केले. हवामान बदलाचे दुष्परिणाम हे केवळ भाकित नसून, वस्तुस्थिती असल्याचे दिसत आहे. त्यामुळे त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. तोही विषय भारताने चर्चेत आणला. महिला सबलीकरणावरही भारताने भर दिला. या सर्व विषयांचा समावेश असलेला नवी दिल्ली जाहीरनामा म्हणजे 'जी-ट्वेंटी'चे भारताचे फलित होय. या वर्षी भारताने शांघाय सहकार्य परिषदेचे (एससीओ) यजमानपदही भूषविले होते. रशिया, चीन यांसह प्रामुख्याने मध्य आशियातील देश या परिषदेचे सदस्य आहेत. 'एससीओ' आणि 'जी ट्वेंटी' या दोन परिषदांचे यजमानपद भूषवून भारताने आपली प्रतिमा अधिक उजळ केली आहे.'जी-ट्वेंटी'चे यजमानपद ही एक वैश्विक संधी होती. ती साधून भारताने आपल्यातील बदलाचे जगाला दर्शन घडविले. विकासाच्या मार्गावर वेगाने जात असलेला, आत्मविश्वासाने भरलेला भारत ही नवीन ओळख अधोरेखित केली गेली. नवे सहस्रक सुरू झाल्यापासून देशातील आणि काही प्रमाणातील जगातील निरीक्षकही भारताबद्दल आशावाद दाखवित होते. एकविसावे शतक भारताचे असेल याचा पुनरुच्चार सातत्याने केला जात होता. मोठी लोकसंख्या असलेल्या भारताची बाजारपेठ मोठी असणे हे कारण त्यामागे असेलच; परंतु त्याच्याच जोडीने देशात असलेले मोठे मनुष्यबळ, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कामगिरी, काही क्षेत्रांत 'सॉफ्ट पॉवर' म्हणून भारताने निर्माण केलेले स्थान, परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांमुळे बदलत गेलेला दृष्टिकोन आदी कारणेही त्यामागे होती. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, अवकाश तंत्रज्ञान आदी क्षेत्रांत भारतीयांची कामगिरी लक्षवेधक ठरली. लोकसंख्येची कमान चढती असल्यावर त्याचे ओझे होते हे खरे; परंतु त्यामुळे काम करू शकणाऱ्या तरुणांची संख्या वाढते. संख्याशास्त्राच्या भाषेत याचा उल्लेख 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' असा करतात. गेली काही वर्षे भारताला लोकसंख्येवरील हा 'लाभांश'ही मिळत आहे. दुसरीकडे चीनच्या वाढलेल्या महत्त्वाकांक्षा आणि त्यामुळे अमेरिकेशी वाढलेले वितुष्ट याचा लाभही भारताला होत गेला. विशेषत: तो अमेरिकेच्या अधिक नजीक गेला. गेल्या दोन दशकांत क्रमाक्रमाने घडलेल्या बाबींचे एक फलित म्हणजे जी-ट्वेंटीचे यजमानपद. त्याचे यशस्वी आयोजन करून भारताने पुढचा टप्पा गाठला. या परिषदेतून ज्या मूल्यांचा जागर करण्यात आला त्यांची जागतिक स्तरावर आणि देशातही अंमलबजावणी होईल, यासाठी आग्रह धरण्याची खरी गरज आहे.

ब्रम्हपुरी येथे काँग्रेसची तालुका आढावा बैठक संपन्न

पक्षाची संघटनात्मक बांधणी करून पक्षाचे विचार तळागळापर्यंत पोहचवा – आ.विजय वडेट्टीवार

चंद्रपूर । प्रतिनिधी

देशात सर्वत्र महागाई, बेरोजगारी, धर्मांधता पसरवून अराजकता माजविण्याचे काम सुरू आहे. याचा विरोध म्हणून नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यातील निवडणुकींचा निकाल काँग्रेस ला कौल देणारा असल्याचे भाकीत वृत्त वाहिन्या देत आहे. आगामी काळात येणाऱ्या निवडणुकांना समर्थपणे पुढे जाण्यासाठी पक्षाची संघटनात्मक बांधणी करून पक्षाचे विचार तळागळापर्यंत पोहचवा असे आवाहन राज्याचे विरोधी पक्षनेते आ.विजय वडेट्टीवार यांनी केले.

ब्रम्हपुरी येथे तालुका काँग्रेस कमिटी व सर्व गावांतील ग्राम काँग्रेस अध्यक्ष व सचिव यांच्या आढावा बैठकीत उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.आयोजित आढावा बैठकीस काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्राचार्य देविदास जगनाडे, सेवादलाचे गुड्डेवार गुरूजी, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, तालुका काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य डॉ राजेश कांबळे, माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमुरकर, नगरपरिषदेचे गटनेता विलास

विखार, माजी जि.प. सदस्या स्मिता पारधी, प्रदेश काँग्रेस प्रवक्ता बालाजी गाडे, माजी पं.स. सदस्य थानेश्वर कायरकर, माजी पं.स. सभापती नेताजी मेश्राम, नगरसेवक डॉ. नितीन उराडे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सोनू नाकतोडे, अनुसूचित जाती सेलचे तालुकाध्यक्ष प्रमोद मोटघरे, माजी न.प.उपाध्यक्ष बंटी श्रीवास्तव, महीला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष मंगला लोनबले, महीला काँग्रेसच्या शहराध्यक्षा योगिता आमले, नगरसेवक ॲड. बाला शुक्ला, बाजार समितीच्या उपसभापती सुनिता तिडके, नगरसेविका सरिता पारधी, नगरसेविका निलीमा सावरकर, नगरसेविका वनीता अलगदेवे, माजी जि.प. सदस्या भावना ईरपाते, अनुसूचित जाती सेलचे जिल्हा सहसचिव डि.के. मेश्राम यांसह अन्य काँग्रेस पदाधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.कार्यकर्त्यांना संबोधित करतांना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, भाजपने फोडाफोडीचे राजकारण करून 'खोटे बोला पण रेटून बोला' या मुल मंत्राचा वापर करून सत्ता काबीज केली. सत्तेच्या मदमस्तीत व्यापारी हित जोपासत देशातील गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांचा छळ केल्या जात आहे. धर्मांधतेच्या नावावर जातीभेद निर्माण करून जाती जातींमध्ये तेढ निर्माण केली जात आहे. आता देशातील मतदार जागृत झाला असून आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेसचा विजय स्पष्ट दिसून येत आहे. तरी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गाफील न राहता आगामीनिवडणुकांमध्ये भक्कम बाजूने उभे राहण्याकरिता व काँग्रेस उमेदवारांना जिंकून आणण्यासाठी सर्व शक्तीनिशी कंबर कसून पक्षाची संघटनात्मक बांधणी करून पक्षाचे विचार तळागाळापर्यंतच्या नागरिकांपर्यंत पोहोचवा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी ब्रह्मपुरी तालुक्यातील काँग्रेस कमिटीचे सर्व पदाधिकारी, ग्राम काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, सचिव, बूथ कमिटीचे सर्व सदस्य, सर्व सेलचे पदाधिकारी तथा काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

रब्बी पिकाचे अवकाळी पाऊस व गारपिटीने नुकसानीची ऑनलाइन नोंदणी शेतकऱ्याने तात्काळ करावी–अशोक हिंगे पाटील

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्यातील तसेच बीड जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी अवकाळी पाऊस व गारपिटीने कापूस, तुर आणि कांदा पिकांच्या झालेल्या नुकसानीच ऑनलाईन तक्रार तात्काळ कराव्यात असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे.

सध्या अवकाळी पाऊस व गारपीटने कापूस, तूर व खरीप कांदा पिकाचे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांनी ऑनलाईन तक्रार केल्या आहेत. त्यात काही विशिष्ट गावातील शेतकऱ्यांनी जास्त तक्रारी आल्या आहेत. इतर गावांमध्ये याबाबत काही गांभीर्य नाही. तक्रार केली तरच पीकविमा नुकसान भरपाई मिळेल. पुन्हा वेळ निघून गेल्यावर काही उपयोग नाही एकरी ३ ते ५ हजारांचे नुकसान करून घेऊ नका.. उद्याच्या दिवस वेळ आहे. ऑनलाईन तक्रार केली तरचं आपल्याला भविष्यात मदत मिळणार आहे, आपल्या गावातील शेतकरी, मित्र, शेती असलेले पाहुणे, यांना या बाबत तात्काळ कळवावे, त्यांना एकरी हजारोंची मदत मिळू शकते. तसेच सर्व शेतकरी बांधवांनी रब्बी हंगामातील पीकांचा देखील पिक विमा भरून घ्यावा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे.

बीडमध्ये उद्धव ठाकरे यांची सेना खऱ्या अर्थाने झाली 'निजाम' सेना

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांची जहरी टीका

बीड । प्रतिनिधी

उद्धव ठाकरे यांच्या गटाने हिंदुत्व सोडल्याचे याआधीच अनेकदा कृतीतून दाखवून दिले आहे. त्यात आता बीड जिल्ह्यात ठाकरे गटाने पदाधिकारी निवडी करताना हिंदुत्ववादी लोकांना बाजूला करून एमआयएमच्या माजी जिल्हाध्यक्षाला शहरप्रमुख करून खऱ्या अर्थाने 'निजाम' सेना तयार केली आहे, अशी जहरी टीका शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केली आहे.पत्रकात पुढे म्हटले आहे की, बीड नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही महिन्यांपूर्वी जिल्हाध्यक्षासह इतरांना उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत पक्षात प्रवेश दिला गेला. प्रत्येक नगरपालिका निवडणुकीआधी क्षीरसागर घराणे राजकीय खेळी करते. या खेळीचा भाग म्हणूनच हा प्रवेश झालेला आहे. निवडणुकीआधी शहरातील संख्येने मोठ्या असणाऱ्या प्रत्येक समाजाचे उमेदवार निवडून येऊ नयेत म्हणून त्या समाजाच्या मतांचे विभाजन करण्यासाठी विविध पक्षात पाठवतात. जास्त मतांचे अगदी ठाकरे वर्ष निवडणुकीच्या क्षीरसागरांचे भुमिका असलेल्या त्या समाजाचे जास्तीत उमेदवार उभे करुन विभाजन करतात. अशांपैकी एक नेत्याला ठाकरे गटात हिंदुविरोधी एमआयएमचे नेते उद्या स्वतःला हिंदुत्ववादी म्हणणाऱ्या ठाकरे गटाचे उमेदवार म्हणून पुढे आले तर आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. आजघडीला त्यांच्यावर शहराची जबाबदारी देऊन तसे संकेतच देण्यात आले आहे. परंतु उद्धव ठाकरे यांच्या गटाला आगामी नगरपालिका निवडणुकांमध्ये तोंडघशी पडण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही, असे सांगून बीड शहर आणि जिल्ह्यातील ठाकरे सेनेतील हिंदुत्ववादी लोकांसाठी ही दुर्दैवी वेळ आहे, असेही . मुळूक यांनी म्हटले आहे.

डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या निष्काळजी पणामुळे विनोद कामडे यांचा मृत्यू

उच्चस्तरीय चौकशी करून तात्काळ कारवाईची मागणी

मूल । प्रतिनिधी

ग्रामिण रुग्णालय मूल येथील डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे विनोद कामडे यांचा मृत्यू झाल्याचा आरोप करून, संबधितांवर कारवाई करावी अशी मागणी काँग्रेसने केली आहे. काँग्रेसचे जिल्हा महासचिव तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राकेश रत्नावार यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे तसे निवेदन देवून चौकशीची मागणी केली आहे.मूल नगर परिषदेचे माजी नगरसेवक विनोद कामडे यांना ३० नोव्हेंबर ला अचानक पोटामध्ये दुखू लागले.त्यांना पहाटे ५.०० वाजता ग्रामीण रूग्णालय मूल येथे उपचारासाठी दाखल केले असता त्यांना १२.०० वाजेपर्यंत भरती ठेवलं.दुपारी १२.०० वाजता त्यांना डॉक्टरांनी चुकीच्या पद्धतीने उपचार करून घरी पाठविले. मृतक विनोद कामडे यांच्या पोटाच्या तीव्र वेदना होत असताना त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालय चंद्रपूरला रेफर करण्याऐवजी एसिडिटीचा आहे असे सांगून थातुरमातूर उपचार केला. तीव्र वेदना असह्य त्यांना परत दुपारी ४ वाजता ग्रामिण रूग्णालयात भरती करण्यात आले.मात्र त्रास अधिक होत असल्याने त्यांना चंद्रपूरला रेफर करण्यात आले. चंद्रपूरला जातानाच रस्त्यातच विनोद कामडे यांची प्राणज्योत मावळली. मूल ग्रामिण रुग्णालयातील डॉक्टर व आरोग्य कर्मचार्यांने चुकीचा उपचार केला.सकाळीच रेफर केले असते व वेळेवर रूग्णवाहीका उपलब्ध करून दिली असती तर विनोद कामडे यांचा जीव गेला नसता असे निवेदनातून रत्नावार म्हटंले आहे. डॉक्टर व कर्मचार्यांच्या निष्काळजीपणामुळेच विनोद कामडे यांचा जीव गेल्याचा आमचा स्पष्ट आरोप असून याबाबतची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, दोषीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी रत्नावार यांनी केली आहे.या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषीवर कठोर कारवाई केली नाही तर या विरोधात ग्रामिण रूग्णालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशाराही रत्नावार यांनी दिला.

विदर्भ राज्य आंदोलन पुन्हा जोर पकडणार

विदर्भ निर्माण संकल्प यात्रेला विदर्भ आंदोलनाची जन्मभूमी अहेरी येथून सुरुवात

गडचिरोली । प्रतिनिधी

वेगळे विदर्भ राज्यासाठी कट्टर विदर्भवादी नेते कै.राजे विश्वेश्वरराव महाराज, कै. राजे सत्यवानराव महाराज यांचा नेतृत्वाखाली झालेल्या अनेक आंदोलनाची साक्षीदार असणाऱ्या विदर्भ आंदोलनाची जन्मभूमी राजनगरी अहेरी येथूनच पुन्हा नव्या जोमाने जनतेमध्ये जनजागृती करून स्वतंत्र विदर्भ राज्य आंदोलन पटविण्यासाठी विदर्भ निर्माण संकल्प यात्रेची सुरुवात करण्यात आली.जीवनाचा शेवटच्या श्वासापर्यंत स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी संघर्ष करणारे विदर्भवीर कै.राजे विश्वेश्वरराव महाराज यांच्या अहेरीतील मुख्य चौकातील पूर्णाकृती पूतळ्याला पुष्पहार अर्पण करुन त्यांचे आशीर्वाद घेत माजी आमदार ऍड.वामनराव चटप यांचा नेतृत्वाखाली ही संकल्प यात्रा अहेरी येथून सुरू करण्यात आली. यावेळी जय विदर्भचा नाऱ्यांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला, या प्रसंगी मोठ्या संख्येने विदर्भवादी नेते तथा कार्यकर्ते उपस्थित होते.

वेतनाच्या थकबाकीसाठी एफडीसीएमच्या २० कर्मचाऱ्यांचे अन्नत्याग

कन्हाळगाव,झरन परिक्षेत्रातील वनरक्षकांचाही आंदोलनात सहभाग

गोंडपिपरी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ मर्यादित मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३० जून २०२१ या कालावधीची धकबाकी मंजुर करण्यासंदर्भात त्यांच्या संघटनांनी शासन तथा प्रशासनाकडे अनेकदा पाठपुरावा केला.प्रत्यक्ष भेटी सुध्दा घेतल्या.मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे आपल्या न्याय मागण्यासाठी एफडीसीएमच्या कर्मचाऱ्यांनी चंद्रपुरातील एफडीसीएम कार्यालयासमोर काल (दि.१) पासून अन्नत्याग आंदोलनाला सुरुवात केली आहे.आज दुसऱ्या दिवशी गोंडपिपरी तालुक्यातील वनकर्मचाऱ्यांसह २० सेवानिवृत्त आणि कार्यरत कर्मचाऱ्यांनी आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग घेतला.

महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ मर्यादित मधील अधिकारी व कर्मचा–यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३० जून २०२१ या कालावधीची वेतनातील थकबाकी मिळणेकरीता त्यांनी मागील दोन वर्षापासून सतत

पाठपुरावा केला.अजूनही प्रयत्न सुरू आहेत.याकरिता कर्मचाऱ्यांनी महसूल व वनविभागाचा शासन निर्णय क्र.एफडीसी २०१९/प्र.क्र.२९/फ–५ दि.१६.०९.२०२१,याच विभागाचा दुसरा शासन निर्णय क्र. एफडीसी–२०२२/प्र.क्र.०७/फ–५ दि.१६.०१.२०२३ आणि त्यांच्या संघटनेचे पत्र क्र.१०३,दिनांक ०२.११.२०२३,११३,दिनांक १०.११.२०२३ चा संदर्भ जोडला आहे.शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादीत मधील कर्मचान्यांना सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारीत वेतनश्रेणी अंतर्गत दिनांक १ जानेवारी २०१६ ते ३० जून २०२१ या कालावधीच्या वेतनाची थकबाकी अदा करण्याबाबत प्रस्तावासंदर्भात मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली.सदर समिती गठीत होऊन दहा ते अकरा महिन्याचा कालावधी लोटला आहे.दरम्यान अजूनपर्यंत या उपसमितीद्वारे एकही बैठक घेण्यात आली नाही.अशावेळी १ जानेवारी २०१६ ते ३० जून २०२१ पर्यंत ६३० अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले.सद्या त्यांना केवळ दोन हजार ते तीन हजार एवढेच निवृत्तीवेतन मिळत असल्यामुळे तुटपुंज्या पगारावर जगताना त्यांची आर्थिक आणि कौटुंबिक परिस्थिती बिकट झाली आहे.कर्मचारी मानसिक विवंचनेत सापडले आहेत.शासन व प्रशासनाकडे सलग दोन वर्षापासून त्यांचा पाठपुरावा सुरू असतांना त्यांच्याकडून विषयांकीत प्रकरणी दुर्लक्ष होत आहे.एफडीसीएम कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधून तो निकाली काढावा,याकरीता ६ नोव्हेंबर २०२३ ते ८ नोव्हेंबर २०२३ पर्यंत काळया फिती लावून लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.परंतू आजतागायत कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भात कुठल्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आला नाही.त्यामुळे नाईलाजास्तव संघटनेद्वारे कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काल (दि.१) पासून एफडीसीएमचे कार्यालयासमोर अत्रत्याग सत्याग्रह सुरू केले आहे.सदर प्रकरणी शासनाकडे पाठपुरावा करुन न्याय मिळवून द्यावा,अशी मागणी महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ अधिकारी व कर्मचारी संघटनेचे कार्याध्यक्ष बी.बी.पाटील,केंद्रीय सचिव एस.एस.राठोड यांनी केली आहे.त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री व वनमंत्र्यांना सादर केले आहे.

पर्यावरण आणि वनांचे महत्व समजण्यासाठी 'ताडोबा' हे चालते बोलते विद्यापीठ-वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

हताडोबा व्याघ्र प्रकल्पातील सफारी तसेच महसूल विभागाच्या वाहनांचा लोकार्पण सोहळा

चंद्रपूर । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या पर्यटन नकाशामध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा समावेश आहे,ही जिल्ह्यासाठी अतिशय अभिमानास्पद बाब आहे. पर्यावरण तसेच वनांचे महत्व समजण्यासाठी ताडोबा पर्यटन ही महत्वाची बाब झाली असून हे एक चालते-बोलते विद्यापीठच आहे,असे विचार राज्याचे वन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले.

ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील सफारीकरीता पर्यटन वाहनांचे लोकार्पण करतांना ते बोलत होते. नियोजन भवन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला ताडोबा अंधारी प्रकल्पाचे क्षेत्रीय संचालक जितेंद्र रामगावकर,जिल्हाधिकारी विनय गौडा,मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन,जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्र परदेशी,सहाय्यक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम.,राहूल पावडे,देवराव भोंगळे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.गतवर्षी देश-विदेशातील जवळपास ३ लाखांच्या वर पर्यटक ताडोबा व्याघ्र प्रकल्प बघण्यासाठी आले,असे सांगून वनमंत्री मुनगंटीवार म्हणाले,ताडोबा प्रकल्पातील सोयीसुविधा

उत्तम व्हाव्यात,यादृष्टीने काही महत्वाचे निर्णय घेतले असून सिंगापूरच्या आर्किटेक्चरला डिझाईन बनविण्याचे काम देण्यात आले आहे. देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात सुंदर टायगर सफारी ताडोबाची राहील,यासाठी आपण प्रयत्नशील आहो. अतिशय महत्वाच्या व्यक्ती येथे येत असतात. त्यामुळे टायगर सफारीकरीता गाड्या टप्प्याटप्प्याने बदलविण्याचा निर्णय घेण्यात आला. यातील पहिल्या टप्पात आज सहा गाड्यांचे लोकार्पण होत आहे,असे वनमंत्री मुनगंटीवार यांनी सांगितले.चंद्रपूर जिल्ह्यात राहणा-या गरीबातील गरीब विद्यार्थ्यांनाही ताडोबाची व्याघ्र सफारी व्हावी,त्यांना वनांचे निरीक्षण जवळून करता यावे तसेच पर्यावरणाचा अभ्यास व्हावा,यासाठी जिल्ह्यातील ७५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना'चला जाणूया वनाला'या उपक्रमांतर्गत मोफत वनपर्यटन,व्याघ्र दर्शन घडविण्याचा निर्णय घेतला आहे. याच धर्तीवर राज्यातील ७५ हजार विद्यार्थ्यांना ताडोबासह राज्यातील इतर अभयारण्यात वन व वाघ्र पर्यटनाचे मोफत नियोजन करण्यात येणार आहे.नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत नवीन क्रुझर वाहनांसाठी ९२ लक्ष ७९ हजार रुपयांचा निधी : ताडोबा वन्यजीव कोअर विभागात जिप्सी व कॅन्टर वाहनाद्वारे पर्यटक सफारीचा आनंद घेतात. कोअर विभागातील बरेच रस्ते एकेरी व छोटे असल्याने कॅन्टर वाहन जाण्यास अडचण निर्माण होते. तसेच या वाहनांच्या आवाजामुळे इतर पर्यटकांना त्रास होतो. त्यामुळे कँटरद्वारे सफारी करणाऱ्या पर्यटकांना दर्जेदार पर्यटनाचा अनुभव देण्याच्या दृष्टीने नऊ आसनाचे क्रुझर पर्यटन वाहन सुरू करण्याची संकल्पना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मांडली. यासाठी जिल्हा वार्षिक योजना (२०२२-२३) नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत क्रुझर वाहन खरेदी करण्यासाठी ९२ लक्ष ७९ हजार रुपयांचा निधी जिल्हाधिकारी,चंद्रपूर यांच्याकडून प्राप्त झाला.नवीन क्रुझर वाहनात जंगल सफारीच्या दृष्टीने आवश्यक बदल करण्यात आले आहेत. ही वाहने मोहर्ली गेटवरून पर्यटकांसाठी नियमीत उपलब्ध राहतील.या वाहनांसाठी बुकींग व्यवस्था पूर्वीप्रमाणेच बुकींग मशीनद्वारे क्षेत्र संचालक,ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प,चंद्रपूर कार्यालयात उपलब्ध राहील.

महसूल विभागासाठी १० नवीन बोलेरो :

महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर गतीमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजनेंतर्गत महसूल विभागातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्यासाठी १० नवीन बोलेरो गाड्यांचे लोकार्पण पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले.

आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते

चार दिवस मॅरॅथॉन भुमी पूजन व लोकार्पण सोहळा

चंद्रपूर । प्रतिनिधी

वरोरा- भद्रावती मतदारसंघाच्या आमदार प्रतिभा बाळुभाऊ धानोरकर यांनी विकास कामाचा वसा अंगिकारला आहे. भद्रावती तालुक्यात मागील आठवड्यात सर्वाधिक भूमिपूजन व लोकार्पण घेतले. त्याच प्रमाणे आता वरोरा तालुक्यात देखील चार दिवस मॅरॅथॉन भुमीपूजन व लोकार्पण सोहळा घेऊन या भागाच्या विकासाचा नवीन चेहरा निर्माण करण्याचे काम सुरु आहे.

शुक्रवारी वरोरा तालुक्यातील विविध विकास कामांचे भुमीपूजन व लोकार्पण सोहळा पार पडला. या सोहळ्यात आमदार धानोरकर यांच्यासह वरोरा तालुका काँग्रेस अध्यक्ष मिलिंद भोयर, वरोरा कृषी उत्पन्न बाजार समिती माजी सभापती राजेंद्र चिकटे, पंचायत समिती माजी सभापती रवींद्र धोपटे, प्रदीप उरकुडे, दिवाकर निखाडे, विजू आत्राम, शालिक झाडे, डॉ. पठाण, बंडू शेलकी यासह सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी, आमदार धानोरकर यांनी सांगितले की, वरोरा भद्रावती मतदारसंघातील सर्व गावांमध्ये विकास कामे सुरू आहेत.

या विकास कामांसाठी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याचाच परिणाम म्हणून आज वरोरा तालुक्यातील १६ गावांमध्ये विविध विकास कामांची सुरुवात झाली आहे.या सोहळ्यात वरोरा तालुक्यातील बोर्डा, जामगाव बु., जामगाव खु., दिदोडा, मेसा, महालगाव बु., धानोली, शेगाव बु., भेंडाळा, चारगाव खु., अकोला नं.२, गिरोला, साखरा, लोधीखेडा, खेमजई आणि परसोडा या गावांमध्ये विविध विकास कामांची सुरुवात करण्यात आली. या कामांमध्ये स्मशानभूमी रस्ता, सिमेंट कॉंकीट रस्ता, समाज भवन, ग्रा. पं. भवन, आर.ओ. वॉटर एटीएम मशीन बसविणे, पुलाचे बांधकाम यांचा समावेश आहे. या विकास कामांमुळे वरोरा तालुक्यातील नागरिकांना मोठा लाभ होणार आहे.

बीडमध्ये राज्य नाट्य स्पर्धेला सुरुवात मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे उदघाटन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून २० नोव्हेंबर पासून महाराष्ट्रभर वेगवेगळ्या केंद्रावर महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला सुरुवात झालेली आहे. त्या अनुषंगाने बीड केंद्रावर यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे गुरुवार (दि.३०) नोव्हेंबर पासून महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला सुरुवात झाली. अशी माहिती सांस्कृतिक कार्य संचालनाल याचे संचालक बिभीषण चवरे यांनी दिली. या स्पर्धेचे उदघाटन नाट्य परिषदेच्या बीड अध्यक्षा दीपाताई क्षीरसागर , ज्येष्ठ रंगकर्मी नाटककार डॉ. सतीश साळुंके, डॉ .मनोहर सिरसाठ, पत्रकार सुनील डोंगरे, प्रा.केशव भागवत , परीक्षक कुबल भालचंद्र, डॉ.गणेश वडोडकर, संगीता परदेशी व समन्वयक समन्वय मुकुंद धुताडमल, प्रविण निसर्गंध, प्रविण राठोड, वैभव निवारे, अक्षय कोकाटे, अमोल सानप,ऋषिकेश दाभाडे, अशोक पवार, सतीश राठोड आदींच्या उपस्थितीत करण्यात आले. महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार व सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे मार्गदर्शनाखाली पार पडत आहे. असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक बीभीषण चवरे यांनी सांगितले.महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेला सर्व नाटकांना बीडमधील जास्तीत जास्त नाट्य रसिकांनी उपस्थित राहून नाटकांचा आनंद घ्यावा असे आवाहन संचालक श्री चवरे यांनी केले आहे. सादर होणारी नाटकं १) जिवंत मुडदे २) गुलाल ३) चिरंजीव ४) मॅट्रिक ५) पाऊस अशी एकूण नाटके दि. ३० नोव्हेंबर २०२३ ते ४ डिसेंबर २०२३ दरम्यान रोज सायं. ७ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड येथे होणार आहेत.

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण

शहराची सुंदरता व स्वच्छतेमध्ये नागरिकांचे योगदान महत्वपूर्ण-सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार

चंद्रपूर । प्रतिनिधी

नियमित स्वच्छता व शहर सुशोभिकरणाच्या माध्यमातून शहराचे रूप बदलत असते. त्याकरीता शहराच्या सुंदरतेत व स्वच्छतेमध्ये नागरिकांचे श्रम आणि त्यांचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन राज्याचे वने,सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे सुंदर माझी ओपन स्पेस,सुंदर माझे उद्यान व शहर सौंदर्यीकरण आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेच्या बक्षिस वितरण कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम.,अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधू,महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल,उपायुक्त अशोक गराटे,उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार,इको-प्रो चे बंडू धोत्रे,पोलीस निरीक्षक राजपूत,अभय पडगेलवार,राहुल पावडे,ब्रिजभुषण पाझारे,सुभाष कासनगोट्टूवार,महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रामुख्याने उपस्थिती

होती.माझं शहर सुंदर आणि स्वच्छ असावे,याच मानसिकतेतून नागरिकांनी श्रमदान व योगदान द्यावे,असे आवाहन करीत पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले,शहराच्या सौंदर्यीकरणासाठी महानगरपालिकेने सुंदर माझे उद्यान,सुंदर माझी ओपन स्पेस स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेच्या माध्यमातून सर्व नागरीक एकत्रित आले. लहान मुले जेव्हा उद्यानात खेळायला जातात,तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद असतो. लाखो रुपये खर्च करून देखील असा आनंदी चेहरा बघता येत नाही. त्यासाठी उद्याने उत्तम करा आणि ओपन स्पेस विकसित करा,असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.पुढे ते म्हणाले,चंद्रपूर शहर व जिल्ह्यामध्ये आज सर्वाधिक उद्याने आहेत. घुग्गूसमध्ये १० पेक्षा जास्त उद्याने,बल्लारपूरमध्ये १४ पेक्षा जास्त ओपन स्पेस विकसित केले तर चंद्रपूर शहरामध्ये महानगरपालिकेने वैशिष्ट्यपूर्ण निधीतून १५ पेक्षा जास्त बालउद्याने विकसित केली आहेत. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उद्यान,ऑक्सीजन पार्क,जॉगर्स पार्क आणि महाराष्ट्रातील सर्वात मोठे,उत्तम व सुंदर अशा बॉटनिकल गार्डनची निर्मिती करण्यात आली आहे. वनमंत्री झाल्यावर महाराष्ट्रात वृक्ष लागवडीचा उपक्रम सुरू केला. एका दिवसात २ कोटी ८७ लक्ष वृक्ष लावण्याचा संकल्प केला आणि जनतेने यात सहभाग घेतला. राजीव गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर वृक्ष लागवड करण्यात आली होती. दाट जंगलाचा भास होईल इतक्या सुंदर वृक्षाचा विस्तार त्या ठिकाणी झाल्याचे पालकमंत्री मुनगंटीवार म्हणाले.

उत्कृष्ट कार्य व योगदानाबद्दल अधिकाऱ्यांचा सत्कार :

गणेशोत्सवात योगदान दिल्याबद्दल सहायक जिल्हाधिकारी मुरुगानंथम एम.,अपर पोलीस अधिक्षक रिना जनबंधू,उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार,दुर्गापूर पोलीस स्टेशनचे चिंतावार तसेच शहर पोलीस स्टेशनचे राजपूत,डॉ.अमोल शेळके,मनिषा कन्नमवार यांचा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते शॉल,श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

गणेश मंडळाना प्रोत्साहनपर पुरस्कार :

गणेश मंडळाना उत्स्फुर्त सहभागाबद्दल जयहिंद गणेश मंडळ,सार्वजनिक गणेश मंडळ,ओम गणेश मंडळ,जोडदेऊळ पठाणपुरा गणेश मंडळ आदी मंडळांना पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आला. तर दत्तनगर येथील नवयुवक बाल गणेश मंडळास विशेष पर्यावरणपुरक प्रथम पुरस्कार देण्यात आला.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .